पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक १

-- सभावृत्तांत --

दिनांक : १३/०४/२००९ वेळ: सकाळी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे एप्रिल २००९ ची मासिक सभा सोमवार दिनांक १३/०४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या **अ** प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. दत्तात्रय बाबुराव साने
२. मा. तानाजी विठ्ठल खाडे
३. मा. गोपाळ नाना कुटे
४. मा. वैशाली संजय उबाळे
५. मा. विजया अशोक जाधव
६. मा. शशिकिरण गवळी

याशिवाय मा. श्री. एम.एस. देवणीकर, पीठासीन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे, मा. श्री झुरे पी.एच., प्रभाग अधिकारी, मा.श्री बी.टी. बनकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा. श्री निकम एम.डी., कार्यकारी अभियंता (स्थापत्य मुख्यालय), मा.श्री चिंचवडे, कार्यकारी अभियंता (विद्युत) मा. श्री ए.जी. भोसले, प्रशासन अधिकारी, मा. श्री. नाईकरे, श्री शेळके, सहा. आरोग्य अधिकारी, मा. श्री फुटाने, श्री.दिलीप कुदळे उपअभियंता (स्थापत्य), तसेच मा.श्री रामगुडे उपअभियंता (पाणीपुरवठा) इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

पीठासीन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका, पुणे, — मा. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी त्या कामकाजाची व्हीडीओ चित्रीकरणाद्वारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

मा. सचिव प्रशासन अधिकारी — मा.अ प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेकामी एकमेव उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामधील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १ | दत्तात्रय बाबुराव साने | मा.तानाजी खाडे | मा. गोपाळ कुटे |

पीठासीन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका, पुणे, — अ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून तो वैध ठरवण्यात आला आहे. त्यामध्ये मा.अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा. दत्तात्रय बाबुराव साने हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक :- १ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १३/०४/२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदासाठी एकमेव अर्ज मुदतीत दाखल झाला तो वैध ठरवण्यात आला आहे. त्यामध्ये मा.अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा. दत्तात्रय बाबुराव साने हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. दत्तात्रय बाबुराव साने यांची अ प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-xxx
पीठासीन प्राधिकारी
तथा
अतिरिक्त आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे,

यानंतर मा. दत्तात्रय बाबुराव साने यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले व सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १३/०४/२००९ | विभाग | : |
| सुचक | : मा. तानाजी खाडे | अनुमोदक | : मा. गोपाळ कुटे |

अ प्रभाग समितीची सभा प्रत्येक महिन्याचे दुसऱ्या शुक्रवारी दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

खालील प्रमाणे उपसुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.तानाजी खाडे अनुमोदक :- मा.विजया जाधव

सदरची सभा दिनांक ०८/०५/२००९ रोजी सकाळी ११.५५ वाजेपर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदर उपसुचना सर्वानुमते मान्य झाली

मा. अध्यक्ष - सदरची सभा शुक्रवार दिनांक ०८/०५/२००९ रोजी सकाळी ११.५५ वाजे पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

सही/-xxx
(दत्तात्रय बाबुराव साने)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक १
(दिनांक १३/०४/२००९ ची तहकुब सभा)

-- सभावृत्तांत --

दिनांक : ०८/०५/२००९ वेळ: सकाळी ११.५५ वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे एप्रिल २००९ दिनांक १३/०४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता ची तहकुब करणेत आलेली मासिक सभा शुक्रवार दिनांक ०८/०५/२००९ रोजी सकाळी ११.५५ वाजता महानगरपालिकेच्या **अ** प्रभाग कार्यालयातील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. दत्तात्रय बाबुराव साने -- अध्यक्ष
२. मा. रघुनंदन रामभाऊ घुले
३. मा. विजया अशोक जाधव
४. मा. एकनाथ दादा थोरात
५. मा. महेश गंगाराम चांदगुडे
६. मा. भिमा सखाराम बोबडे
७. मा. सुलभा रामभाऊ उबाळे
८. मा. शशिकिरण गवळी
९. मा. जावेद रमजान शेख

याशिवाय मा. श्री झुरे पी.एच., प्रभाग अधिकारी, मा.श्री बी.टी. बनकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा. श्री निकम एम.डी., कार्यकारी अभियंता (स्थापत्य मुख्यालय), मा.श्री चिंचवडे, कार्यकारी अभियंता (विद्युत) मा. श्री ए.जी. भोसले, प्रशासन अधिकारी, मा.श्री आव्हाळे, लेखाधिकारी, मा. श्री. नाईकरे, श्री शेळके, सहा. आरोग्य अधिकारी मा. श्री फुटाने, श्री.दिलीप कुदळे उपअभियंता (स्थापत्य), मा. श्री कांबळे व्ही.जी. उपअभियंता (पाणीपुरवठा), मा. श्री देशमुख उपअभियंता (विद्युत), मा.श्री.परदेशी उपअभियंता जलनि:सरण तसेच मा. श्री चौरे, (नगररचना विभाग), इत्यादी अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य व अधिकारी यांचे आभार मानून व स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

दिनांक १३/३/०९ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्र.१४) सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे सभापतींनी प्रगट केले.

ठराव क्रमांक : ३ विषय क्रमांक : ३
दिनांक : ०८/०५/२००९ विभाग : नगररचना व विकास विभाग
सुचक : मा. एकनाथ थोरात अनुमोदक : मा. महेश चांदगुडे

संदर्भ : मा. आयुक्त सो यांचेकडील पत्र क्रमांक
जा.क्र. नरवि/कावि/३ /९२/०८ दिनांक २३/७/२००८

मा. आयुक्त सो यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन नियंत्रण कक्षेतून वगळून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ठ झालेल्या क्षेत्राच्या विकास योजनेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : ४ विषय क्रमांक : ४
दिनांक : ०८/०५/२००९ विभाग : नगररचना व विकास विभाग
सुचक : मा. भिमा बोबडे अनुमोदक : मा. सुलभा उबाळे

संदर्भ : मा. आयूक्त सो यांचेकडील पत्र क्रमांक क्र.
जा.क्र.नरवि/ कावि / ३ / ३७० /२००८ दिनांक २२/१२/२००८

मा. आयुक्त सो यांनी शिफारस केलेप्रमाणे

मौजे तळवडे, भागशः मंजुर विकास योजनेतील ९०.०० मी. रस्त्याची रुंदी ७५.०० मी. करण्याबाबत.
विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले

सही/-xxx
(दत्तात्रय बाबुराव साने)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
क्र. अप्र/प्रशा/२/कावि/ ११६ /०९
दिनांक :- २५ / ०५ /२००९

सही/-xxx
प्रशासन अधिकारी
अ प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी पुणे-४४

प्रत :- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना